# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२३/०८/१७
## दि.२२/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४१४/१७,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | पो.हवा. देवरुखकर,भारती विद्यापिठ पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | सितेंदरसिंग शिवजी सिंग,वय-४०,रा.कात्रज,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०८/१७ रोजी ०९/४५ वा. यशवंत विहार,शिवशंभो नगर,कात्रज,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सितेंदरसिंग शिवजी सिंग याने यशवंत विहार,शिवशंभो नगर,कात्रज,पुणे याठिकाणी मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षित तेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता, तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्या मुळे,यातील बिगारी कामगार राजेश गोविंद साहु,वय-२३,रा.गोकुळनगर,कात्रज,पुणे हा इमारतीचे नवव्या मजल्यावर काम करीत असताना,त्याचा तोल जावुन,तो वरून खाली पडुन त्याचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन,तो मयत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मदने ९८८१३७०५०१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे ७३/१७,भादविक ३९७,३९४,५०४,५०६(२),४२७,३४ |
| **फिर्यादी** | नवनाथ ढेबे,वय-१९ वर्षे,रा.हिंगणे खुर्द,पुणे |
| **आरोपी** | १.रविंद्र बाळु आखाडे,वय-३२,रा.कोल्हेवाडी,नांदोशी,ता.हवेली,जि.पुणे २.गणेश नाना आखाडे, वय-१९,रा.मोगरवाडी,सिंहगड रोड,पुणे ३.गणेश ऊर्फ अक्षय विठठल मरगळे,वय-१९,रा. नांदोशी,ता.हवेली,जि. पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०८/२०१७ रोजी १५/०० वा. अहिरे गेट समोर,गणराज वडापाव टपरी,शिवणे,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा चुलत भाऊ विठठल ढेबे याने मागील दहिहंडीचे वेळी टि-शर्ट छापले होते. त्यावेळी त्याने त्याचा मावस भाऊ रविंदं आखाडे याचा फोटो टि-शर्टवर टाकला नसल्याने त्यांचेमध्ये शाब्दीक बाचाबाची झाली होती. याकारणावरुन वडापाव टपरी येथे रविंद्र बाळु आखाडे,गणेश नाना आखाडे,गणेश ऊर्फ अक्षय विठठल मरगळे असे मोटार सायकल वरुन येवुन,गणेश आखाडे जवळ असणारे पिशवीतुन त्यांनी दातेरी चाकु व ककुरी अशी हत्यारे काढुन फिर्यादी यांना तुझी टपरी बंद कर असे म्हणुन शिवीगाळ करून,टपरी मधील तेलाची कढई उलटी करून,गॅसचा पाईप कापुन,शोकेसला हात मारुन काच फोडली. तसेच फिर्यादी यांना हत्याराचा धाक दाखवुन,टपरी मधील गल्ल्यातील जमा झालेले ४००/- रुपये गणेश आखाडे याने हात घालुन काढुन,स्वतःचे खिशात ठेवुन मोटार सायकलवरून उत्तमनगरचे दिशेने पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक, (गुन्हे), के.एस.जांभळे ८३०८८११५४४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २१७/१७,भादविक ३८५,३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरुष,वय-५२,रा.लक्ष्मीनगर,पर्वती,पुणे |
| **आरोपी** | १.उद्दलसिंग दुधाणी,रा.रामटेकडी,हडपसर,पुणे २.मलक्यासिंग दुधाणी,रा.सदर व इतर एक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०८/१७ रोजी ११/३० ते ११/४५ वा.चे दरम्यान नाइकनवरे डेव्हलपर्स शिवाजीनगर,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी असिस्टंट कन्सलटंट व सिक्युरिटी अधिकारी म्हणुन काम करीत आहेत. यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे ऑफीस मध्ये येऊन त्यांना ११,०००/- रुपये गणपतीची वर्गणी मागुन,वर्गणी न दिल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन धक्का-बकी केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. खरात ८६००८६७०६३ |
| ४ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २८५/१७,भादविक ४६५,४६६,४६८,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-१८,रा.शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०८/१७ रोजी ०४/३९ वा.ॲस्टुट ॲकडमी प्रा.लिमी.श्रीफल अपार्टमेंट,शिवाजीनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील<br>यातील फिर्यादी यांनी www.dtemaharashtra.gov.in या वेबसाईटवर कॉलेजच्या प्रवेशा साठी कॉलेजच्या नावांची यादी नमुद केली असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे युजर आयडी व पासवर्ड मध्ये परस्पर फेरबदल करुन,त्यांचे फॉर्म मध्ये फेरबदल करुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. गजानन पवार, सायबर सेल,गुन्हे शाखा,पुणे शहर ९१५८५२०००२ |
| ५ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७१०/१७,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | प्रतिक परदेशी,वय-२१ वर्ष,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | १.राजु,रा.लिबासपुर,नॉर्थ वेस्ट दिल्ली २.भारती,रा.उत्तर प्रदेश ३.महंमद तबरेज आलम,रा. फोयनिक सर्व्हिसेस,नोएडा,उत्तर प्रदेश |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०४/२०१७ ते दि.०६/०६/२०१७ रोजीचे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसांत संगनमत करून,फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर फोन करून ते fyanamic finance या कंपनी मधुन बोलत असल्याचे सांगुन,मा.प्रधानमंत्री योजने अंतर्गत तुम्हाला १४ लाख रुपयेचे कर्ज देतो असे सांगुन,त्यांचा विश्वास संपादन करून,फिर्यादी यांना एकुण १,८०,०००/- रुपये खात्यावर भरण्यास भाग पाडुन,फिर्यादी यांचे भरलले पैसे परत न करता त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे) अशोक कदम ८८८८१२०३३३ |
| ६ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३०१/१७,भादविक ४१७,४२०,४०६,५०४,५०७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३३,रा.पुणे |
| **आरोपी** | प्रशांत अत्री,रा.सेक्टर नं.१८,खारघर,नवी मुंबई (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे फेब्रुवारी २०१७ ते दि.२६/०५/१७ रोजीचे कालावधीत खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम प्रशांत अत्री यांची मेट्रोमोनीअल या वेबसाइटवरून ओळख झाली आहे. सदर इसम प्रशांत याचे लग्न झालेले असताना देखील त्याने फिर्यादी यांना घटस्फोट झालेला आहे असे खोटे सांगुन,त्यांना लग्नाचे आमिष दाखवुन त्यांचेशी जवळीक करून,त्यास पैशाची अडचण असल्याचे सांगुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून त्यांचे कडुन १,००,०००/- रूपये रक्कम घेऊन फिर्यादी यांची फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. मुळीक ९७६७१११११७ |
| ७ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४४१/१७,भादविक ३५३,३३२ |
| **फिर्यादी** | विठ्ठल बंडगर,पो.शि., संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक,उत्तर प्रादेशिक विभाग,गुन्हे शाखा,पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपी** | जाफर फखरू इराणी,वय-२७,रा.सैय्यदनगर,महमदवाडी,वानवडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०८/१७ रोजी ११/०० वा. सैय्यदनगर महंमदवाडी,वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे चैन स्नेचींग प्रतिबंधक पट्रोलिंग करीत असताना,यातील नमुद इसम हा फिर्यादी व त्यांचे पथकातील लोकांना पाहुन पळु लागल्याने,फिर्यादी यांनी त्यास पकडुन पोलीस असल्याचे सांगितले असतानादेखील तो पथकातील लोकांशी झटापटी करून त्यांचे हाताला चावुन पळुन जाण्याचा प्रयत्न करुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. म्हेत्रे ९८८१२३८१५६ |

**८**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७०९/१७,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | दिव्या कुंजीर,वय-२३ वर्ष,रा.कोरेगांव,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | आकाश अग्नीहोत्री,रा.सिम्पली सिटी,हडपसर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०८/२०१७ ते दि.२१/०८/२०१७ रोजीचे दरम्यान फिर्यादी यांचे मोबाईल फोनवर व नोवाटेल हॉटेल रामवाडी नगर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी व त्यांची बहिण या दोघांना खाजगी नामांकीत कंपनी विमान नगर,पुणे येथे कामास लावतो असे सांगुन,नोवाटेल हॉटेल येथे बोलावुन घेवुन त्यांचा इंटरव्हयु घेण्याचा बहाणा करून,इंटरव्हयु घेतेवेळी सदर इसमाने सासरे आलेले आहेत,त्यांना भेटुन येतो असे सांगुन,फिर्यादी व त्यांचे बहीणीकडुन सोन्याची चैन व मोबाईल असा ३३,०००/- रुपये किचा ऐवज घेवुन,फिर्यादी व त्यांचे बहिणीचा विश्वासघात करून त्यांना नोकरीला न लावता त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.पी.लोहार ९८५०२२३१९० |

## <u>दि.२३/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३३५/१७,भादविक ३९९,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | गणेश गायकवाड,पो.ना.कोंढवा पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.रविंद्र उर्फ खन्ना रामु परदेशी,वय-२६,रा.वानवडी,पुणे २.अक्षय बाबासाहेब लोंढे,वय-२१, रा.केदारीनगर,वानवडी,पुणे ३.प्रतिक प्रकाश थोरात,वय-२७,रा.शिवनेरीनगर,कोंढवा,पुणे ४.आकाश मनोज परदेशी,वय-२०,रा.वानवडी,पुणे ५.अविनाश बबन खोसे,वय-२४,रा.सिध्दार्थ नगर कोंढवा-खुर्द,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०८/१७ रोजी सकाळी ०४/३० वा. कोटक महिंद्रा बँक साळुंके विहार रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे दोन कोयते,लाकडी काठया,कटावणी,सुती दोरी इत्यादी घातक शस्त्रे,तसेच पाच मोबाईल व कार नं.एमएच/१२/केएन/६१५३ असा एकुण ४ लाख ८ हजार ९१० रू किचा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,कोटक महिंद्रा बँक साळुंके विहार रोड,पुणे स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना अ.क्र.१ ते ५ मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जी.बी.कुलाळ ९०११०५२६४० |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चिंचवड पो स्टे २२७/१७,भादविक ३०७ |
| **फिर्यादी** | मंगल सोनवणे,वय-४२,रा.मुंपो.अकलुज,सोलापुर |

| | |
|---|---|
| **आरोपी** | भावडया उर्फ आकाश भारत कुदळे,रा.दळवीनगर चिंचवड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०८/१७ रोजी २२/०० वा. दळवीनगर,चिंचवड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ शंकर भारत धुमाळ,वय-३५,रा.दळवीनगर,चिंचवड,पुणे याने त्याची पत्नी सौ.मोनाली शंकर धुमाळ हिस स्वयंपाक झाला का असे विचारले असताना,तीने स्वयंपाक करते ना असे बोलल्याचे कारणावरून तीस मारहाण केली,त्याचा राग मनात धरून सौ.मोनाली हिचा भाऊ भावडया उर्फ आकाश भारत कुदळे याने कु-हाडीने शंकर भारत धुमाळ याचे डोक्यावर व मानेवर वार करून त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर बी सोडनवर ९८२३६२४८०१ |

## दि.२२/०८/१७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | हडपसर | भादविक ३०२ | आकाश साईनाथ चव्हाण | २३ |
| २ | हडपसर | भादविक ३०६,३८४,३८७,३४ | संदिप रामचंद्र गद्रे | २८ |
| ३ | मार्केटयार्ड | भादविक ३९४,३४ | अनिल राजु काकडे | ३२ |
| ४ | सहकारनगर | भादविक ४२०,४६७,४६८,४७१,३४ | मिलींद उध्दव करंजकर | ४५ |
| ५ | वानवडी | भादविक ३५३,३३२ | जाफर फखरू ईराणी | २७ |
| ६ | वाकड | भादविक ३९५,४२७,३४ | ईमरान जमशेर शेख | २४ |
| ७ | वाकड | भादविक ३९५,४२७,३४ | संदिप सुरेश गंभीरे | २१ |
| ८ | वाकड | भादविक ३५४(अ) | सईद मोहमद यासीन शेख | ५३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**